दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे








वर्ष ५ । अंक २४४ । शुक्रवार २६ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322


### छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने पुतळ्यास अभिवादन

## धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, स्वाभिमान आणि धर्मनिष्ठा आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी – संपत बारस्कर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनकार्याचा गौरव करत त्यांच्या शौर्य, स्वाभिमान आणि धर्मनिष्ठेचा प्रेरणादायी वारसा समाजासमोर मांडला.

यावेळी बोलताना संपत बारस्कर म्हणाले की, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांनी अवघ्या नऊ वर्षांच्या कार्यकाळात १२० हून अधिक लढाया लढल्या आणि एकही युद्ध न हरता मोगल सत्तेला समर्थपणे रोखून धरले. त्यांचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व, असामान्य विद्वत्ता आणि हिंदू धर्मावरील अखंड निष्ठेमुळे त्यांना 'धर्मवीर' ही गौरवपूर्ण उपाधी मिळाली.



ते पुढे म्हणाले की, कोणत्याही परिस्थितीत छत्रपती संभाजी महाराजांनी स्वाभिमान, राष्ट्रनिष्ठा आणि धर्माशी कधीही तडजोड केली नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी स्वराज्याचे सक्षम नेतृत्व करत शत्रूंचा धैर्याने मुकाबला केला. राज्यकारभारात त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेती सुधारणा यांना विशेष प्राधान्य दिले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि पराक्रमामुळे स्वराज्य अधिक बळकट झाले. धर्मवीर संभाजी महाराजांचे जीवन हे शौर्य, त्याग, राष्ट्रप्रेम आणि स्वाभिमानाचे जिवंत उदाहरण असून आजच्या युवकांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, प्रा. माणिक विधाते, नगरसेवक बाळासाहेब पवार, प्रकाश भागानगरे, सुरेश बनसोडे, महेश तवले, रेवन्नाथ पवार, मयूर बांगरे, गोरख पडोळे, सुरज कोतकर, जॉय लोखंडे, सुरत शिंदे, नितीन घोडके, तुषार यादव, मारुती पवार, वैभव ढाकणे, संतोष ढाकणे, सागर गुंजाळ, भाऊ बारस्कर, सचिन पवार, रवी दंडी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त उपस्थितांना शुभेच्छा देत त्यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकला. संभाजी महाराजांचे अद्वितीय शौर्य, त्याग, राष्ट्रभक्ती आणि धर्मरक्षणासाठी दिलेले बलिदान हे प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत त्यांच्या विचारांचे आचरण करण्याचे आवाहन त्यांनी केले.



शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी भेट दिली असता त्यांच्याहस्ते गणेशाची आरती करण्यात आली यावेळी देवस्थानच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर ,भाजपचे शहर जिल्हाअध्यक्ष अनिल मोहिते ,भाजपा युवा मोर्चाचे जिल्ह्याध्यक्ष रुद्रेश अंबाडे आदींसह नगरसेवक पदाधिकारी उपस्थित होते. ( छाया– राजू खरपुडे ,नगर)

# भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांची आमदार संग्राम जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

## स्वर्गीय माजी आमदार अरुण काका जगताप यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन; युवकांचे प्रश्न आणि शहर विकासावर सकारात्मक चर्चा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी आमदार संग्राम जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते कृष्णराज महाडिक यांचा सत्कार करण्यात आला. भेटीदरम्यान त्यांनी स्वर्गीय माजी आमदार अरुण काका जगताप यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन केले.

या प्रसंगी भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक महेश तवले, भाजप युवा मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष रुद्रेश अंबाडे, माजी नगरसेवक संभाजी पवार, विशाल पवार, अतुल कावळे, सचिन पवार आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी युवकांच्या



विविध प्रश्नांबाबत तसेच शहराच्या सर्वांगीण विकासासंदर्भात आमदार संग्राम जगताप यांच्याशी सविस्तर चर्चा केली. युवकांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी ■ पान ४ वर

# केडगाव प्रभाग क्रमांक १६ मधील भाग्योदय मंगल कार्यालय नागरिकांसाठी खुले करावे

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरज कोतकर यांची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केडगाव येथील प्रभाग क्रमांक १६ मधील महानगरपालिका मालकीचे भाग्योदय मंगल कार्यालय सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी लवकरात लवकर सुरू करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरज रविंद्र कोतकर यांनी आमदार संग्राम जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, प्रभागातील भाग्योदय मंगल कार्यालय हे मागील काही वर्षांपासून अत्यंत जीर्ण अवस्थेत व बंद स्थितीत होते. मात्र, आमदार संग्राम जगताप यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे आणि प्रयत्नांतून या मंगल कार्यालयाचे नूतनीकरण व सुशोभीकरण अत्यंत दर्जेदार पद्धतीने करण्यात आले आहे. त्यामुळे प्रभागातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण ■ पान ४ वर



(छाया : वाजिद शेख)

मोहरम विसर्जन मिरवणुकीत मंगलगेट येथे इमामे हसन –हुसेन (छोटे व मोठे बारे इमाम) यांची सवारी एकत्र आली असता. यावेळी भाविकांचा जनसमुदाय.

# बाधित शेतकऱ्यांसाठी २१.३० कोटींच्या मदतीला मंजुरी

## १९९ गावांतील २१,४९५ शेतकरी लाभार्थी १२,३४६ हेक्टरवरील पिकांचे नुकसान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एप्रिल महिन्यामध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने २१ कोटी ३० लाख ३७ हजार ४०० रुपयांच्या मदतीस मंजुरी दिली आहे. निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी याबाबतचे आदेश निर्गमित केले असून, पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अनुदानाची रक्कम थेट जमा करण्यात येणार आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी सादर केलेल्या अंतिम सुधारित पंचनामे व अहवालानुसार जिल्ह्यातील १९९ गावांमधील तब्बल २१ हजार ४९५ शेतकरी अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे बाधित झाले आहेत. या नैसर्गिक आपत्तीत १२ हजार



३४६.३९ हेक्टर क्षेत्रावरील विविध पिकांचे नुकसान झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

तालुकानिहाय पाहता नेवासा तालुक्याला सर्वाधिक फटका बसला असून, तेथे १० हजार २९४ शेतकरी आणि ६ हजार ३३५.७२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. याशिवाय राहुरी, पारनेर, राहाता आणि कोपरगाव या तालुक्यांमध्येही ■ पान ४ वर

# रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशात अव्वल; मंत्री भरतशेट गोगावले यांनी उपमुख्यमंत्री शिंदेंकडे सोपवला प्रगतीचा यशस्वी अहवाल

**दैनिक आकर्षण ।**

**विशेष प्रतिनिधी / मुंबई:** महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचा कायापालट करणाऱ्या आणि लाखो कुटुंबांना हक्काचा रोजगार देणाऱ्या रोजगार हमी व फलोत्पादन विभागाच्या कामगिरीचा यशस्वी अहवाल राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरतशेट गोगावले यांनी आज राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला. मुंबई येथे झालेल्या या विशेष भेटीदरम्यान उपमुख्यमंत्री शिंदे यांनी विभागाच्या या ऐतिहासिक घोडदौडीबद्दल तीव्र समाधान व्यक्त करत मंत्री गोगावले आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे विशेष कौतुक केले. या प्रसंगी रोजगार हमी योजना विभागाचे विशेष कार्यकारी अधिकारी योगेश भुतडा यांच्यासह विभागाचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. लाखो कुटुंबांना वैयक्तिक लाभाच्या योजनांचा थेट फायदा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार



हमी योजनेच्या (नरेगा) माध्यमातून महाराष्ट्रातील ग्रामीण भागात सध्या क्रांती घडत आहे. राज्यातील लाखो कुटुंबांना केवळ रोजगारच मिळत नाही, तर त्यांच्या शाश्वत उपजीविकेसाठी गाय-गोठे, विहिरी, आणि शेततळी यांसारख्या वैयक्तिक लाभाच्या योजना अत्यंत प्रभावीपणे राबवल्या जात आहेत. याशिवाय, गावांमधील पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी मातोश्री शेत-पाणंद रस्ते, गावांतर्गत सिमेंट काँक्रीट व पेव्हर ब्लॉक रस्ते, अंगणवाड्या, सायन्स पार्क, आणि स्मशानभूमी सुशोभीकरण यांसारखी सार्वजनिक विकासाची कामे राज्यभरात यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली आहेत.

नरेगा सॉफ्ट प्रणालीत महाराष्ट्र देशात नंबर १ वर! डिजिटल पारदर्शकतेमध्येही महाराष्ट्राने देशात अव्वल स्थान पटकावले आहे. केंद्र शासनाची नरेगा सॉफ्ट प्रणाली राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीपर्यंत यशस्वीपणे पोहोचवण्यात महाराष्ट्र संपूर्ण देशात पहिल्या क्रमांकावर (अव्वल स्थानावर) आहे. तसेच, निधीच्या प्रभावी अंमलबजावणीत आणि नियोजनात महाराष्ट्र देशात चौथ्या क्रमांकावर असून, ही राज्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे.

मनरेगा अंतर्गत ४४ हजार हेक्टरवर फळबाग लागवडीचा विक्रम ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवा वेग देण्यासाठी मनरेगा अंतर्गत फलोत्पादन कृषी विभागानेही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. राज्यभरात आतापर्यंत सुमारे ४४ हजार हेक्टर क्षेत्रावर यशस्वी फळबाग लागवड करण्यात आली असून, यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठी वाढ होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळत आहे.

अधिक जोमाने काम करण्याची ऊर्जा मिळाली! साहेबांच्या (उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे) दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे आणि ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### राज्यभर सिमेंटच्या दर्जेदार शेतरस्त्यांचे जाळे उभे करू- शरद पवळे



अहिल्यानगर- शेतकऱ्यांच्या हक्काच्या शेतरस्त्यांसाठी सुरू असलेला संघर्ष हा कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून, शेतरस्ते अडवून शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या प्रवृत्तीविरोधात आणि प्रशासकीय त्रुटींमुळे होणाऱ्या अन्यायाविरोधात असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी केले. पारनेर येथील शासकीय विश्रामगृहावर आयोजित शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, शेतरस्ता बंद झाला म्हणजे केवळ एक मार्ग बंद होत नाही, तर त्या शेतकरी कुटुंबाच्या आशा, स्वप्ने आणि भविष्याचा मार्गही अडवला जातो. अनेक शेतकरी अज्ञान, आर्थिक अडचणी आणि न्याय मिळविण्याच्या मर्यादित साधनांमुळे हतबल होतात. शेतात जाण्याचा मार्ग बंद झाल्याने होणारे आर्थिक नुकसान, वर्षानुवर्षे चालणारे वाद आणि त्यातून निर्माण होणारा मानसिक ताण संपूर्ण कुटुंबाला अस्वस्थ करून टाकतो.पवळे म्हणाले की, अनेक वेळा ही परिस्थिती इतकी गंभीर बनते की शेतकऱ्यांना जमिनी विकाव्या लागतात, नातेसंबंध तुटतात, वाद वाढतात आणि काही दुर्दैवी प्रसंगी आत्महत्या किंवा हत्यांसारख्या घटना घडतात. याच वेदनेतून राळेगणसिद्धीनारायणगव्हाण परिसरातील शेतरस्ता संघर्षातून शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचा जन्म झाला.

### भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात रुजू झालेल्या सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक तेजश्री थोरात यांचा गौरव



अहिल्यानगर- भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे नुकत्याच सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (एपीआय) म्हणून रुजू झालेल्या तेजश्री थोरात यांचा स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था आणि श्री नवनाथ युवा मंडळाच्या वतीने विशेष सत्कार करून गौरव करण्यात आला. त्यांच्या कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक आणि लोकाभिमुख कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आल्याचे उपस्थितांनी स्पष्ट केले. या सत्कार समारंभाला स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, नागापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चाँद शेख, संजय सावंत यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### हिवरगाव पावसा टोलनाक्यावरील युवकाच्या मृत्यूची उच्चस्तरीय चौकशी करा

अहिल्यानगर - संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा टोलनाक्याजवळ झालेल्या भीषण अपघातात एका युवकाचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने पोलीस अधीक्षकांकडे करण्यात आली आहे. रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, ज्येष्ठ नेते दिलीप साळवे, तालुकाध्यक्ष कृष्णा गाडे व विलास महादेव कदम यानी निवेदन पोलीस अधीक्षकांना दिले.निवेदनात म्हटले आहे की, संगमनेर तालुक्यातील निमगाव टेंभे येथील वैभव विलास कदम (वय १९) हा युवक कामानिमित्त मोटारसायकलवरून जात असताना हिवरगाव पावसा टोलनाक्याजवळ भरधाव कारने धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात मोटारसायकल सुमारे २०० फूट दूर फेकली गेल्याचा दावा करण्यात आला आहे. घटनेचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असतानाही अपघाताची निष्पक्ष चौकशी झालेली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच संबंधित वाहनचालक व वाहनमालक प्रभावशाली असल्यामुळे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत असल्याची शंका व्यक्त करण्यात आली आहे. अपघातानंतर वाहनाची अदलाबदल करण्यात आल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.


# कल्याण रोड परिसरातील रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग; नागरिकांचे आरोग्य धोक्यात

### आठ दिवसांत कचऱ्याचा प्रश्न मार्गी न लागल्यास आयुक्तांच्या दालनात तीव्र आंदोलन - ॲड. युवराज शिंदे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील कल्याण रोड परिसर हा झपाट्याने विकसित होत असलेला निवासी भाग असून या परिसरात मोठ्या संख्येने नागरिक वास्तव्यास आहेत. मात्र, महानगरपालिकेच्या घंटागाडीचे नियोजन विस्कळीत झाल्याने आणि नियमित वेळेत कचरा संकलन होत नसल्यामुळे नागरिकांकडून रस्त्यांच्या कडेला ठिकठिकाणी कचरा टाकला जात आहे. परिणामी परिसरात मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढीग साचले असून दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे.

विशेषतः उद्धव अकॅडमी शाळेसमोरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना दुर्गंधी आणि अस्वच्छ वातावरणाचा सामना करावा लागत असून पालकांमध्येही तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सामाजिक कार्यकर्ते ॲड. युवराज शिंदे यांनी या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधत महानगरपालिका प्रशासनावर टीका केली आहे. ते म्हणाले की, कल्याण रोड परिसरात नव्याने तयार करण्यात



आलेल्या डीपी रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची कामे पूर्ण झाली असली तरी स्वच्छतेच्या बाबतीत प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. विश्व मॉलच्या पाठीमागील भागात मोठा कचऱ्याचा ढीग निर्माण झाला असून त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

यावेळी बोलताना ॲड. युवराज शिंदे म्हणाले की, ''कल्याण रोड परिसरात नोकरदार वर्ग मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहे. त्यामुळे घंटागाडीचे नियोजन वेळेवर होणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक वेळा घंटागाडी नियोजित वेळेत येत नसल्याने नागरिकांना पर्याय नसल्यामुळे रस्त्याच्या कडेला कचरा टाकावा लागतो. परिणामी ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग निर्माण झाले आहेत. ही परिस्थिती तातडीने बदलणे गरजेचे आहे.''

ते पुढे म्हणाले की, ''रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांवरही महानगरपालिकेने दंडात्मक कारवाई करावी. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याची जबाबदारी नागरिकांचीही आहे. मात्र, त्यासाठी महानगरपालिकेनेदेखील आपली जबाबदारी पार पाडत घंटागाडीचे योग्य नियोजन करावे आणि वेळेवर प्रत्येक नागरिकाच्या दारापर्यंत सेवा पोहोचवावी.'' महानगरपालिका प्रशासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन पुढील आठ दिवसांत कल्याण रोड परिसरातील कचऱ्याचा प्रश्न मार्गी लावावा, अन्यथा आयुक्तांच्या दालनात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही ॲड. युवराज शिंदे यांनी दिला आहे.

## माझे बाबा आहेत मास्टरशेफ उपक्रम पोदार प्रेपमध्ये उत्साहात संपन्न



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पोदार प्रेप शाळेत विद्यार्थी आणि पालकांसाठी आयोजित करण्यात आलेला 'माझे बाबा आहेत मास्टरशेफ' हा अनोखा आणि आनंददायी उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमातून वडील आणि मुलांमधील नाते अधिक दृढ करण्याबरोबरच मुलांच्या सर्जनशीलतेला आणि आत्मविश्वासाला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य मंगेश जगताप उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापिका निकिता राठी यांची विशेष उपस्थिती लाभली. यावेळी त्यांनी विद्यार्थी आणि पालकांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे मुलांचा आत्मविश्वास वाढतो, सर्जनशीलतेला वाव मिळतो आणि कुटुंबातील नातेसंबंध अधिक दृढ होतात, असे मत व्यक्त केले.

स्पर्धेत सहभागी झालेल्या वडिलांनी आपल्या मुलांसोबत विविध स्वादिष्ट खाद्यपदार्थ तयार करून पाककलेचे उत्कृष्ट सादरीकरण केले. प्रत्येक संघाने कल्पकता, टीमवर्क आणि उत्साहाचे सुंदर दर्शन घडवले. विविध आकर्षक पदार्थांच्या सादरीकरणामुळे कार्यक्रमात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

उपस्थित पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा मनमुराद आनंद घेतला. स्पर्धेतील प्रत्येक सहभागीच्या प्रयत्नांचा गौरव करण्याच्या उद्देशाने सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या वडिलांना सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत ज्ञानेश्वर विद्यालय एकतुणीचा दणदणीत विजय

### सर्वाधिक गुणांकन मिळवत पटकावला प्रथम क्रमांक; विभागीय क्रीडा संकुलात झाला सन्मान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये समर्थ शिक्षण संस्था, हडको, छत्रपती संभाजीनगर संचलित ज्ञानेश्वर विद्यालय, एकतुणी (ता. पैठण) यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सर्वाधिक गुणांकन मिळवून प्रथम क्रमांकाचा मान पटकावला. विद्यार्थ्यांच्या दमदार क्रीडा प्रदर्शनामुळे विद्यालयाने तालुक्यात आपला दबदबा सिद्ध केला.

सन २०२५-२६ च्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये विविध क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाने अव्वल स्थान मिळविले. या यशाबद्दल विभागीय क्रीडा संकुल, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित विशेष समारंभात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त शाळांचा गौरव करण्यात आला.

यावेळी क्रीडा उपसंचालक शेखर पाटील व जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई यांच्या हस्ते ज्ञानेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक कापसे सर तसेच क्रीडा शिक्षक तांबे सर यांचा शाल, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन यामुळे हे यश शक्य झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. विद्यालयाच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे एकतुणी परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तसेच आगामी जिल्हास्तरीय व विभागीय स्पर्धांमध्येही विद्यालयाचे खेळाडू यशाची परंपरा कायम ठेवतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## भूमिहीनांना हक्काची जमीन द्या; घरकुल प्रस्ताव तात्काळ मंजूर करा

### बसपाची प्रशासनाकडे मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** घरकुल लाभार्थ्यांचे अतिक्रमित जागेचे प्रस्ताव तात्काळ मंजूर करावेत, भूमिहीन नागरिकांच्या वास्तव्यास असलेल्या अतिक्रमित जागांचे नियमितीकरण करून त्यांच्या नावावर नोंदी कराव्यात तसेच शेतीसाठी अतिक्रमित जमीन कसणाऱ्या कुटुंबांना मालकी हक्क देऊन त्यांच्या नावावर ७/१२ उतारे तयार करावेत, अशी मागणी बहुजन समाज पार्टीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पक्षाच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांची भेट घेऊन निवेदन दिले.



यावेळी बहुजन समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष (दक्षिण) सुनिल ओहोळ, जिल्हाध्यक्ष (उत्तर) सुरेश कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष शाहनवाज शेख, जिल्हा महासचिव मेजर राजू शिंदे, बाळकृष्ण काकडे, उमाशंकर यादव, संजय संसारे, ज्ञानदेव साळवे, राहुल हिरभगत, कचरू लष्करे, सचिन खरात, संदीप मोरे, प्रकाश साबळे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जिल्ह्यात अनेक भूमिहीन कुटुंबे स्वतःच्या मालकीची जागा नसल्यामुळे अतिक्रमित जागांवर वास्तव्यास आहेत. शासनाच्या घरकुल योजनांचे लाभार्थी असूनही त्यांच्या वास्तव्यास असलेल्या जागांची मालकी निश्चित नसल्यामुळे घरकुलांचे प्रस्ताव रखडले आहेत. परिणामी अनेक कुटुंबे शासनाच्या विविध योजनांच्या लाभापासून वंचित राहत आहेत.

बसपाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, अनेक लाभार्थ्यांचे घरकुल प्रस्ताव पंचायत समिती स्तरावरून पुढे पाठविण्यात आले असले तरी अद्याप त्यांना मंजुरी मिळालेली नाही. अशा सर्व प्रलंबित प्रस्तावांना तातडीने मंजुरी देऊन घरकुल योजनांचा लाभ संबंधित नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता आहे.

तसेच काही लाभार्थ्यांनी घरकुलांची उभारणी पूर्ण केली असली तरी त्यांच्या घरांच्या नोंदी अद्याप ग्रामपंचायत दप्तरी करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे संबंधित नागरिकांना मालमत्तेचे अधिकृत दस्तऐवज मिळण्यात अडचणी येत आहेत. अशा सर्व घरांच्या नोंदी तातडीने ग्रामपंचायत अभिलेखांमध्ये करण्याची मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

## सर्जेपुरातील महिलांची पोलीस अधीक्षकांकडे धाव; छेडछाड, शिवीगाळ, दमदाटीने परिसरात दहशत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील सर्जेपुरा परिसरात महिलांची छेडछाड, शिवीगाळ, दमदाटी तसेच नागरिकांना त्रास देण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचा आरोप करत परिसरातील महिलांनी थेट जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय गाठले. संबंधित सराईत गुन्हेगारांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी तसेच त्यांना तातडीने तडीपार करण्यात यावे, अशी मागणी महिलांनी निवेदनाद्वारे केली.

महिलांच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका भेट घेऊन सर्जे पुरा परिसरात निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणाची माहिती दिली. यावेळी ज्योती चांदणे, सुनिता नाडे, शिताबाई सोनवणे, सरसाबाई आगमणे, सुनिता साठे, परिगा चांदणे, सावित्री शिंदे, रोहिणी ठोकळ यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सर्जेपुरा येथील महेश भास्कर काळोखे व दीपक काळोखे हे दोघेही सराईत गुन्हेगार असून त्यांनी परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण केले आहे. किरकोळ कारणांवरून नागरिकांना मारहाण करणे, महिलांची छेडछाड करणे, शिवीगाळ व दमदाटी करणे, खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकविण्याच्या धमक्या देणे तसेच दहशतीच्या बळावर नागरिकांना मानसिक त्रास देणे असे प्रकार सातत्याने घडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच संबंधित आरोपींविरुद्ध यापूर्वी कोतवाली पोलीस ठाणे आणि तोफखाना पोलीस ठाण्यात सात ते आठ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यांची यादी महिलांनी पोलीस अधीक्षकांना दिली.

महिलांनी सांगितले की, या दोघांच्या वाढत्या दहशतीमुळे परिसरातील महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य नागरिक भयभीत वातावरणात जीवन जगत आहेत. अनेक वेळा तक्रारी करूनही परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली नाही. उलट त्यांची दहशत दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. आरोपींवर वारंवार गुन्हे दाखल होऊनही त्यांच्या वर्तनात कोणताही बदल झालेला नसल्याचा दावा नागरिकांनी केला आहे.

नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. संबंधित दोन्ही आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कारवाई करून कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात याव्यात. तसेच त्यांना तातडीने तडीपार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात यावी, जेणेकरून परिसरातील नागरिकांना निर्भयपणे जीवन जगता येणार असल्याचे महिलांनी स्पष्ट केले. याप्रकरणी कठोर कारवाई न झाल्यास सर्जे पुरा परिसरातील महिला व ग्रामस्थ लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा दिला आहे.

# मोहरमचा संदेश म्हणजे त्याग, मानवता व सर्वधर्मसमभाव – प्रा. एकनाथ होले



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथे मोहरमच्या निमित्ताने गावात धार्मिक श्रद्धा, सामाजिक सलोखा आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रेरणादायी दर्शन घडले. नालसाब, इमामी कासम, मौला अली यांच्यासह ताबूतांचे पारंपरिक पद्धतीने स्थापना करण्यात आली . यावेळी गावातील हिंदू व मुस्लिम समाजातील नागरिक, युवक आणि ज्येष्ठ मंडळी मोठ्या संख्येने होती. सर्व धर्मीय बांधवांनी एकत्रित सहभाग घेत एकोपा आणि बंधुभावाचा संदेश दिला. अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

यंदा पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर मोहरमच्या कार्यक्रमात सर्व धर्मीय बांधवांनी एकत्र येऊन चांगल्या पावसासाठी प्रार्थना केली. ''सर्वांच्या शेतात भरघोस पीक यावे, जनावरांना चारा-पाणी मिळावे आणि गावात सुख-समृद्धी नांदावी,'' अशी भावनिक प्रार्थना करण्यात आली. या प्रसंगामुळे धार्मिक कार्यक्रमाला सामाजिक संवेदनशीलतेचीही जोड मिळाली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मौलाना मुनीर सय्यद आणि हुसेन सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील हिंदू-मुस्लिम युवकांनी एकत्र येऊन सवाऱ्यांची स्थापना केली . स्थापनेच्या दिवशी नाले हैदर यंग पार्टीच्या वतीने इमामवाडा परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकी आणि सार्वजनिक स्वच्छतेबाबतचा सकारात्मक संदेश देण्यात आला.

हजरत इमाम हुसेन यांच्या बलिदानातून सत्य, न्याय आणि मानवतेसाठी संघर्ष करण्याची प्रेरणा मिळते. नेप्ती गावात अनेक वर्षांपासून सर्व धर्मीय बांधव परस्पर स्नेह, विश्वास आणि आदराच्या भावनेतून एकत्र राहत आहेत. मोहरमसारख्या धार्मिक पर्वातून समाजात बंधुभाव आणि सामाजिक ऐक्य अधिक दृढ होत असल्याचे समाधान वाटते. मोहरमचा संदेश म्हणजे त्याग, मानवता व सर्वधर्मसमभाव आहे असे प्रतिपादन प्राध्यापक एकनाथ होले सर यांनी केले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### राजेंद्र खुंटाळे यांचा ५ जुलैला सेवापूर्ती गौरव समारंभ




अहिल्यानगर- अहिल्यानगर जिल्हा देखरेख संघाचे सचिव तसेच तालुका सुपरवायझर या पदांवर कार्यरत राहून प्रदीर्घ सेवा बजावणारे राजेंद्र खुंटाळे दि. ३० जून रोजी सेवानिवृत्त होत आहेत. खुंटाळे यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ रविवार दि.५ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता निंबळक येथील सार्थक मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास आ.अक्षयदादा कर्डिले, आ.काशिनाथ दाते, पद्मश्री पोपटराव पवार आदींसह राजकीय, सहकार, सामाजिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मिनाक्षी खुंटाळे, पायल खुंटाळे, प्रगती सरोदे, मयूर खुंटाळे, सोनाली जगधने, ओंकार खुंटाळे, निंबळक, इसळक ग्रामस्थ व खुंटाळे मित्र परिवाराने केले आहे.

### मोहरम निमित्त सर्वधर्मीयांसाठी भंडाऱ्याचे आयोजन



अहिल्यानगर - मोहरमच्या पवित्र पर्वानिमित्त शहरातील जुना बाजार रोड येथील पटवेकर मशिदीसमोर इस्लामपुरा फ्रेंड सर्कल आणि गुलशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वधर्मीय नागरिकांसाठी भव्य भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. मोहरमच्या आठवी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या भंडाऱ्याचा शुभारंभ नगरसेवक शम्स खान, खान बाबा, फयाज केबलवाला यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मन्सूर सय्यद, शाहिद शेख, फरान शेख, वसीम शेख, अझहर शेख, मोईन शेख, अफान सोलापूरी, वाहिद लाला कुरेशी आदी उपस्थित होते. मोहरमचा संदेश हा त्याग, मानवता, बंधुभाव आणि सामाजिक एकतेचा असल्याचे सांगत भंडाऱ्यामुळे सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचला.

### कुंतीलालजी भंडारी यांचे निधन



अहिल्यानगर- गणेशवाडी परिसरातील ज्येष्ठ नागरिक तथा सामाजिक क्षेत्रात परिचित असलेले कै. श्री कुंतीलालजी भगवानदासजी भंडारी यांचे दुःखद निधन झाले आहे. मेहुल (टिनूभाऊ) भंडारी यांचे पिताश्री तसेच वृषभ भंडारी यांचे आजोबा होते. त्यांच्या निधनामुळे भंडारी परिवारासह मित्रपरिवार आणि परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक आणि मोठा मित्रपरिवार असा परिवार आहे.कै. कुंतीलालजी भगवानदासजी भंडारी यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.श्री समर्थ सद्गुरु किसनगिरी बाबा नगर भक्त मंडळाच्या वतीने कै. कुंतीलालजी भगवानदासजी भंडारी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### केशव भारताल यांचे अल्पशा आजाराने निधन



अहिल्यानगर - लष्कराच्या एसी सेंटरचे निवृत्त कर्मचारी व सिव्हिल हडको येथील रहिवासी केशव नारायण भारताल यांचे बुधवारी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते मनमिळावू आणि धार्मिक वृत्तीचे होते. सीक्यूएव्ही आस्थापनेतील कर्मचारी नितीन भारताल यांचे ते वडील होत. चित्रकलेतही त्यांचा हातखंडा होता. त्यांनी रेखाटलेली विविध शैलीतील चित्रे चांगलीच गाजली होती. नालेगाव अमरधाममध्ये भारताल यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# महापंचायत ॲप प्रकरणाची त्रिस्तरीय चौकशी करा; अन्यथा आझाद मैदानात बेमुदत उपोषण

**समृद्ध पंचायत राज अभियानाच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप; समृद्ध पंचायत राज अभियानाच्या अंमलबजावणीत अनियमितता?**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेल्या पारनेर, श्रीगोंदा आणि अहिल्यानगर पंचायत समित्यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन केल्याचा गंभीर आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीने केला आहे. या प्रकरणाची त्रिस्तरीय समितीमार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी केली असून यासंदर्भातील निवेदन ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद प्रशासनाला सादर करण्यात आले आहे.

समितीच्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या विविध डिजिटल प्रणाली उपलब्ध असतानाही संबंधित पंचायत समित्यांनी तंत्रज्ञानाचा वापर करताना आवश्यक सुरक्षा निकषांचे पालन केले नाही. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रामपंचायतींचे कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान आणि पेपरलेस करण्याचा उद्देश असताना, त्याऐवजी 'महापंचायत ॲप' या खाजगी सॉफ्टवेअरचा वापर करण्यात आला. या प्रक्रियेत नागरिकांची अत्यंत संवेदनशील माहिती खाजगी सर्व्हरवर अपलोड करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

नागरिकांची आधारसदृश ओळखपत्रे, पॅनकार्ड, बँक खात्यांचे तपशील, घरगुती मालमत्तेची माहिती तसेच इतर वैयक्तिक कागदपत्रे कोणत्याही सुरक्षा हमीशिवाय खाजगी सर्व्हरवर साठविण्यात आली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अशा प्रकारे संवेदनशील माहितीचे व्यवस्थापन करणे हे नागरिकांच्या गोपनीयतेसाठी आणि डिजिटल सुरक्षेसाठी धोकादायक ठरू शकते, असा समितीचा दावा आहे. याशिवाय, शासनाची अधिकृत प्रणाली उपलब्ध असतानाही ग्रामपंचायतींच्या स्वनिधीतून लाखो रुपयांचा खर्च करून महापंचायत ॲपची खरेदी कोणाच्या आदेशाने करण्यात आली, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. शासनाच्या मंजुरीशिवाय किंवा सक्षम अधिकाऱ्यांच्या निर्देशाशिवाय अशा प्रकारच्या खाजगी सॉफ्टवेअरचा वापर करण्यात आला असल्यास त्यामागील जबाबदार अधिकाऱ्यांची भूमिका तपासली जावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

समितीने पुढे असा आरोप केला आहे की, कोणत्याही खाजगी सॉफ्टवेअरला शासकीय कामकाजासाठी वापरण्यापूर्वी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र () किंवा अन्य अधिकृत शासकीय संस्थेमार्फत सुरक्षा तपासणी ( ) होणे आवश्यक असते. मात्र महापंचायत ॲपच्या बाबतीत अशा प्रकारचे सुरक्षा ऑडिट झाले असल्याची कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे या ॲपला मान्यता देण्याची प्रक्रिया, त्यामागील निर्णयप्रक्रिया आणि संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी यांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच ग्रामपंचायतींच्या स्वनिधीचा वापर करून करण्यात आलेल्या खरेदी प्रक्रियेत आर्थिक अनियमितता किंवा निधीचा अपहार झाला आहे का, याचाही तपास करण्यात यावा, अशी मागणी समितीने केली आहे. सिक्युरिटी ऑडिट पूर्ण होईपर्यंत आणि चौकशीचा अहवाल प्राप्त होईपर्यंत महापंचायत ॲपचा वापर तात्काळ बंद करण्याचे आदेश शासनाने द्यावेत, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, या मागण्यांवर प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने मुंबई येथील आझाद मैदानावर बेमुदत उपोषण आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

# अक्षदा वारीनिमित्त हजारो वारकऱ्यांनी घेतले नाथांचे दर्शन

**आषाढी वारीसाठी पालखी सोहळा प्रमुखांकडून अक्षदा देत निमंत्रण**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** कमला एकादशी तथा अक्षदा वारीनिमित्त गुरुवारी पैठण येथे हजारो वारकरी भाविकांनी श्रीसंत एकनाथ महाराजांच्या समाधी मंदिरात दर्शनासाठी मोठी गर्दी केली. यावेळी आषाढी एकादशीच्या पंढरपूर वारीत सहभागी होणाऱ्या वारकरी, मानकरी, सेवेकरी व महाराज मंडळींना पालखी सोहळा प्रमुखांच्या हस्ते पारंपरिक पद्धतीने अक्षदा देऊन वारीचे निमंत्रण देण्यात आले.

कमला एकादशीच्या पूर्वसंध्येला राज्यभरातील नित्यवारी करणारे वारकरी पैठणमध्ये दाखल झाले. भाविकांनी पवित्र गोदावरीत स्नान करून श्रीसंत एकनाथ महाराजांच्या मंदिर व समाधी मंदिरात दर्शन घेतले. टाळ–मृदंगाच्या गजरात भजन, भारूड, गवळणी, फुगड्या आणि ''भानुदास–एकनाथ'' जयघोषाने परिसर भक्तिमय झाला. लहान बालकांपासून महिला भाविकांपर्यंत मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

मंदिर विश्वस्त मंडळाच्या वतीने भाविकांच्या दर्शनासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली. अध्यक्ष आमदार विलास बापू भुमरे, कार्यकारी विश्वस्त दादा पाटील बारे तसेच मंदिरातील कर्मचाऱ्यांनी दर्शन सुरळीत पार पडावे यासाठी नियोजन केले. दर्शनानंतर भाविकांना प्रसादाचे वाटपही करण्यात आले.प्रथेप्रमाणे पंढरपूरच्या आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या नाथांच्या पायी दिंडीतील मानकरी, सेवेकरी, वारकरी व झेंडेकऱ्यांना नाथवंशज रघुनाथबुवा गोसावी पालखीवाले, रवींद्र महाराज पांडव, ज्ञानेश महाराज गोसावी, ॲड. योगेश महाराज गोसावी, सचिन महाराज पांडव आणि श्रीकृष्ण कुलकर्णी यांच्या हस्ते अक्षदा देऊन वारीचे निमंत्रण देण्यात आले.यंदाचा श्रीसंत एकनाथ महाराज पादुका पालखी सोहळा ७ जुलै रोजी पैठण येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. त्यानिमित्त दिंडी चालकांची नियोजन बैठक घेण्यात आली. वारीदरम्यान परिसर स्वच्छ ठेवणे, शिस्त पाळणे आणि सुरक्षिततेची काळजी घेण्याच्या सूचना सोहळा प्रमुख नाथवंशज रघुनाथबुवा गोसावी पालखीवाले यांनी यावेळी दिल्या.

## दिव्यांग जन व जेष्ठ नागरिक यांचेसाठी मोफत सहाय्यक साधन व उपकरण वितरणाकरिता मुल्यमापन शिबीराचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** लोकसभा मतदार संघात दिव्यांग जन व जेष्ठ नागरिक यांचेसाठी मोफत सहाय्यक साधन व उपकरण वितरणाकरिता मुल्यमापन शिबीराचे आयोजन करणे करिता जिल्हाधिकारी कार्यालय,अहिल्यानगर येथे खा. निलेश लंके यांचे अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न झाली.

जास्तीत जास्त दिव्यांगांना सहाय्यक साधने मिळवुन देण्यासाठी कायम प्रयत्नशील आहोत असे खासदार लंके यांनी सांगितले.

त्याचबरोबर जिल्हा रूग्णालयात दिव्यांगांना येणा–या अडचणी, दिव्यांग प्रमाणपत्र वाटप याबाबत पुढील आठवड्यात जिल्हयातील सर्व दिव्यांग संघटना यांना सोबत घेवुन जिल्हा शल्यचिकित्सक, अहिल्यानगर यांचे सोबत बैठक आयोजन करणेबाबत खा निलेश लंके यांनी सांगितले.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष दिव्यांग सेलचे



जिल्हाध्यक्ष रत्नाकर ठाणगे , खासदार निलेश लंके प्रतिष्ठान दिव्यांग संघटनेचे सुनील करंजुले , सावली दिव्यांग संघटनेचे बाबासाहेब महापुरे, बाहुबली वायकर, प्रहार दिव्यांग संघटनेचे मधुकर धाडगे,पोपट शेळके, आसान दिव्यांग संघटनेचे संजय साळवे, प्रहार संघटनेचे लक्ष्मण पोकळे , महाराष्ट्र राज्य दिव्यांग संघटनेचे संतोष सरवदे, बाळासाहेब चव्हाण , जिल्हा सक्षमीकरण अधिकारी देविदास कोकाटे तसेच अनेक विभागाचे अधिकारी उपस्थित होते .

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या ७ जुलैच्या शेवगाव दौऱ्याच्या तयारीला वेग



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक शनिवारी (दि. २० जून) शहरातील शासकीय विश्रामगृह येथे पार पडली. पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे यांच्या प्रमुख उपस्थितीत ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत संघटनात्मक बांधणी, आगामी कार्यक्रमांचे नियोजन आणि कार्यकर्त्यांच्या जबाबदाऱ्यांसह सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या ७ जुलै रोजी होणाऱ्या शेवगाव दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर व्यापक नियोजन करण्यात आले. यावेळी शेवगाव येथे आयोजित करण्यात येणाऱ्या दक्षिण जिल्हा संकल्प मेळाव्याबरोबरच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या भूमिपूजन सोहळ्याची तयारी, उपस्थिती वाढविण्यासाठी आखण्यात येणारी रणनीती आणि जनसंपर्क अभियानावर चर्चा झाली.

बैठकीत विविध तालुके, शहर व आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांना स्वतंत्र जबाबदाऱ्या देण्यात आल्या. आगामी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावागावांत बैठका घेणे, युवक व महिला कार्यकर्त्यांना सक्रिय करणे, तसेच समाजातील विविध घटकांपर्यंत पक्षाची भूमिका पोहोचविण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच शेवगाव येथील कार्यक्रमात रिपब्लिकन पक्ष नगर दक्षिणच्या वतीने ना. आठवले यांची केंद्रात राज्य मंत्रीपद तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल व राज्यसभा सदस्यपदी तिसऱ्यांदा नियुक्ती झाल्याबद्दल नागरी सत्कार केला जाणार आहे. या सोहळ्यासाठी रिपब्लिकन पक्षातील राज्याचे प्रमुख पदाधिकारी व मित्र पक्षाच्या सर्व नेत्यांना निमंत्रित करण्याचे नियोजन देखील बैठकीत करण्यात आले.

या बैठकीस जिल्हा सरचिटणीस विजय भांबळ, विलास साठे, गणेश कदम, मगरे सर, अंबादास अरोळे, शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, युवक जिल्हाध्यक्ष विवेक भिंगारदिवे, अमित काळे, युवक शहराध्यक्ष राहुल कांबळे, महिला जिल्हाध्यक्ष आरती बडेकर, महिला तालुकाध्यक्षा कविता नेटके, महिला शहर जिल्हाध्यक्ष मायाताई जाधव, शेवगाव तालुकाध्यक्ष सतीश मगर, पाथर्डी तालुकाध्यक्ष बाबा राजगुरू, नगर तालुकाध्यक्ष अविनाश भोसले, पारनेर तालुकाध्यक्ष राजू उबाळे, श्रीगोंदा तालुकाध्यक्ष राजाभाऊ जगताप, जामखेड तालुकाध्यक्ष बाळासाहेब शिंदे, पुंडलिक गंगावणे, अशोक शिरसिंग, सोनवणे मामा, युवराज गायकवाड, बापू जावळे, शुभम गायकवाड, शुभम ठोफ्लबे, आंग्रे ताई, जयराम आंग्रे, यशराज शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात अशोक गायकवाड म्हणाले की, रिपब्लिकन पक्षाच्या विचारधारेचा प्रसार अधिक व्यापक करण्यासाठी आणि सामाजिक न्यायाची लढाई अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम करणे आवश्यक आहे. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची ताकद सातत्याने वाढत असून, आगामी काळात संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्याने जबाबदारीने कार्य करावे. सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी पक्ष कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

# आगरकर मळ्यातील पाणीटंचाईविरोधात नगरसेवकांसह नागरिकांचा महापालिकेत ठिय्या

**दोन महिन्यांपासून विस्कळीत पाणीपुरवठ्यामुळे संताप; आयुक्तांकडून १५ दिवसांत प्रश्न सोडविण्याचे आश्वासन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील प्रभाग क्रमांक १५ अंतर्गत येणाऱ्या आगरकर मळा परिसरात गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून पाणीपुरवठा गंभीरपणे विस्कळीत झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या प्रश्नाकडे महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी नगरसेविका गीतांजली काळे, नगरसेवक दत्ता गाडळकर, नगरसेविका पौर्णिमा गव्हाळे आणि नगरसेवक सुजय मोहिते यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी महापालिका आयुक्तांच्या दालनाबाहेर ठिय्या आंदोलन केले.

आंदोलनानंतर शिष्टमंडळाने महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन परिसरातील पाणीपुरवठ्याच्या समस्यांची सविस्तर माहिती दिली. यावेळी आयुक्तांनी संबंधित प्रश्नाची दखल घेत १५ दिवसांच्या आत तो मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. तसेच गजानन कॉलनी परिसरातील संपवेल येथे नवीन मोटार बसविण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी सुनिल काळे, माजी नगरसेवक विजय गव्हाळे, विजय गायकवाड, महेश सुपेकर, प्रसाद कुकडे, कल्पना भळगट, पूजा चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

आगरकर मळा परिसरातील नागरिकांना सध्या अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने अनेक घरांपर्यंत पुरेशा प्रमाणात पाणी पोहोचत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. याशिवाय पाणी सोडण्याच्या वेळा पूर्णपणे अनियमित झाल्याने नागरिकांची गैरसोय वाढली आहे. कधी पहाटे तर कधी मध्यरात्रीनंतर पाणी सोडले जात असल्याने नागरिकांना रात्रभर जागून पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या कुटुंबांना या परिस्थितीचा अधिक त्रास सहन करावा लागत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले.

आंदोलनादरम्यान आगरकर मळा परिसरातील पाणीपुरवठा यंत्रणेतील तांत्रिक अडचणींचाही मुद्दा उपस्थित करण्यात आला. गजानन कॉलनी येथील संपवेलमध्ये कार्यरत असलेली मोटार अनेक वर्षांपासून वापरात असून ती जीर्ण अवस्थेत असल्यामुळे पाणीपुरवठ्यावर परिणाम होत असल्याचे सांगण्यात आले. सद्यस्थितीत टाकी भरण्यासाठी सुमारे चार तासांचा कालावधी लागत असून नवीन मोटार बसविल्यास हा कालावधी कमी होऊन पाणीपुरवठ्याचा दाब आणि नियमितता सुधारण्यास मदत होईल, अशी माहिती उपस्थित नगरसेवकांनी दिली.

गेल्या काही महिन्यांपासून परिसरातील पाणीप्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. कमी दाबाने होणारा पुरवठा, अनियमित वेळापत्रक आणि अनेक भागांमध्ये पुरेसे पाणी न पोहोचणे यामुळे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. या प्रश्नाबाबत वारंवार पाठपुरावा करूनही अपेक्षित कार्यवाही होत नसल्याने अखेर नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला असल्याचेही स्थानिक नगरसेवकांनी सांगितले.

महापालिका प्रशासनाकडे यापूर्वीही अनेक वेळा निवेदने देण्यात आली होती. तसेच पंधरा दिवसांपूर्वीही प्रशासनाला परिस्थितीची कल्पना देण्यात आली होती.

# विद्यार्थ्यांनी ध्येय ठेवून वाटचाल करावी व यशस्वी व्हावे– रोहित रामदिन

**सावेडी डॉक्टर असोसिएशन व प्रिसिजन डायग्नोस्टिक यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दहावी हा जीवनाचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे.विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत चांगले गुण मिळवून शाळेच्या व आई–वडिलांच्या नावलौकिकात भर घातली आहे.या पुढील काळात डॉक्टर, वकील,इंजिनियर तसेच स्पर्धा परीक्षा देऊन पीएसआय, तहसीलदार,जिल्हाधिकारी असे अधिकारी बनण्याचे स्वप्न मुलांनी पहावे. विद्यार्थ्यांनी ध्येय ठेवून वाटचाल केल्यास जीवनात यशस्वी होतील.असे प्रतिपादन विद्यादान अकॅडमीचे रोहित रामदिन यांनी केले

सावेडी येथे डॉक्टर्स असोसिएशन व प्रिसिजन डायग्नोस्टिक यांच्या संयुक्त विद्यमाने सावेडीतील दहावीच्या परीक्षेत मेरीट मध्ये आलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ पार पाडला.याप्रसंगी प्रिसिजन डायग्नोस्टिकचे संचालक डॉ.रणजीत सत्रे,प्रमुख पाहुणे म्हणून विद्यादान अकॅडमीचे रोहित रामदिन,डॉ. अतुल नरसाळे डॉ.शरद ठुबे,डॉ. सुशील नेमाने आदींसह डॉक्टर असोसिएशनचे



अध्यक्ष भगवान कराळे,उपाध्यक्ष डॉ.सुनील सचिव डॉ.नितीन झावरे, खजिनदार डॉ.सुरेंद्र खन्ना,इशेश सर उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ.रणजीत सत्रे म्हणाले, दरवर्षी सावेडी परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येतो.विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप द्यावी तसेच पुढील शिक्षणासाठी त्यांना मार्गदर्शन करावे या उद्देशाने सावेडी डॉक्टर असोसिएशन व प्रिसिजन डायग्नोस्टिकच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन केले जाते.

डॉ.योगिता सत्रे यांनी योग दिनाचे महत्त्व सांगून प्रत्येकाने आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. याविषयी मार्गदर्शन केले आणि योग प्रात्यक्षिक करून दाखवले. तसेच डॉ.भगवान कराळे यांनी अभ्यासाचा सराव कसा करावा याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात सत्कार झालेल्या दहावीच्या विद्यार्थ्यांची नावे कु.अनन्या हेमंत सोले –९८%, कु. रचना रणजीत सत्रे–९७%,,कु.मंजुषा महेश बोरकर ९६.८०% ,कु.अर्णव सुबोध देशमुख–९२.६%. तसेच सकाळ बालनाट्यामहोत्सवमध्ये अभिनयाचे प्रथम पारितोषिक प्राप्त कु.आराध्या देविदास पतंगे यांचा सत्कार करण्यात आला.

## मराठा महासंघाच्या प्रदेश संघटकपदी अतिष गायकवाड यांची निवड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** मराठा समाजातील अभ्यासू, समाजप्रश्नांची जाण असलेले आणि विविध सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घेणारे शिवश्री अतिष भाऊ गायकवाड यांची अखिल भारतीय मराठा महासंघाच्या प्रदेश संघटक पदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे मराठा समाजातील कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अतिष गायकवाड यांनी मराठा समाजाच्या विविध प्रश्नांवर सातत्याने भूमिका मांडत सामाजिक संघटन मजबूत करण्यासाठी कार्य केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत अखिल भारतीय मराठा महासंघाने त्यांच्यावर प्रदेश संघटकपदाची जबाबदारी सोपविली आहे.

या निवडीबद्दल समाजातील विविध मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील सामाजिक आणि संघटनात्मक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाच्या न्याय्य मागण्यांना अधिक बळ मिळेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# रेणुका देवी विद्यालयात शालेय साहित्य वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रेणुका देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपळगाव पिसा येथे गावचे सुपुत्र व उद्योजक गोरख भालके यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमास विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमास डॉ. प्रणोती राहुल जगताप-पाटील (विश्वस्त, कुकडी शिक्षण संस्था) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब पांडुरंग मुठे होते. त्यानंतर विद्यार्थ्यांना शालेय बॅग,स्टेशनरी साहित्याचे वितरण करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधने सहज उपलब्ध व्हावीत आणि त्यांचा आत्मविश्वास वाढावा, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

यावेळी गोरख भालके यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शिक्षण ही समाजाच्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे ही सामाजिक जबाबदारी आहे. गोरख भालके यांनी नेहमीच सामाजिक कार्याला प्राधान्य दिले असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी असे उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. भविष्यातही शिक्षण, पर्यावरण आणि सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम हाती घेतले जातील.

प्राचार्य बाळासाहेब पांडुरंग मुठे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ''विद्यार्थ्यांनी शिक्षणात सातत्य ठेवून आपले ध्येय निश्चित करावे. समाजातील दानशूर व्यक्ती आणि उद्योजकांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळते. गोरख भालके यांनी केलेली मदत विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणारी असून अशा उपक्रमांमुळे शिक्षण क्षेत्र अधिक सक्षम बनते.'' त्यांनी या उपक्रमाबद्दल गोरख भालके यांचे विशेष आभार मानले.

कार्यक्रमास सौ. वीर शालन रामा, अशोक अण्णा गायकवाड, प्रसाद सुधाकर शिंदे, दिलीप लक्ष्मण ननवरे, बाळासाहेब महादेव मांडगे, शशिकांत शांताराम उबाळे, शहाजी अण्णासाहेब भापकर, शाम लक्ष्मण घेगडे, संदीप विकास बोबडे, महेश शहाजी पाडळे, अविनाश बाबासाहेब मांडगे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विद्यालयाच्या शिक्षकांनी केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

# विद्यार्थ्यांमध्ये गुंतवणूक म्हणजे राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी– कृष्णाकांत महाडिक

## बालघर येथील मुलांना भाजप युवामोर्चा जिल्हाध्यक्ष ॲड. ऋद्रेश अंबाडे यांच्यावतीने शालेय साहित्य वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** तपोवन रोड परिसरातील बालघर प्रकल्पामध्ये भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून शिक्षणाबरोबरच सामाजिक उत्तरदायित्वाचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला. भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ॲड. ऋद्रेश अंबाडे यांच्या पुढाकारातून आयोजित या उपक्रमात युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णा महाडिक यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे बालघरातील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला, तर शिक्षणासाठी समाजाने एकत्र येण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली.

यावेळी सरचिवटणीस केलास गर्जे ,नगरसेवक सुजय मोहिते, भाजप उपाध्यक्ष उदय अनभुले , युवा मोर्चा उपाध्यक्ष सोमनाथ जाधव ,सुयश नरसाळे ,शुभम देहेरकर, राजू सातपुते ,अमोल कासार, महेंद्र शिंदे दक्षिण युवा मोर्चा अध्यक्ष सचिन वायकर ,सरचिटणीस गणेश भालसिंग ,बालघर प्रकल्पाचे संचालक युवराज गुंड, भाजयुमोचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच बालघरातील विद्यार्थी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांशी संवाद साधत मान्यवरांनी त्यांना शिक्षण, संस्कार आणि आत्मविश्वासाच्या बळावर जीवनात मोठे ध्येय गाठण्याचे आवाहन केले. उपस्थितांनी विद्यार्थ्यांना सातत्याने अभ्यास करण्यासोबतच समाजाप्रती कर्तव्याची जाणीव ठेवण्याचा संदेश दिला.

यानंतर प्रदेशाध्यक्ष कृष्णाकांत महाडिक यांच्या हस्ते बालघर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत प्रत्येकाने आपल्या आयुष्यात किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही वृक्षांचे महत्त्व समजून घेत पर्यावरण रक्षणाची शपथ घेतली. वृक्षारोपणामुळे परिसरात पर्यावरणाबाबत सकारात्मक जनजागृती झाली.

यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष कृष्णाकांत महाडिक म्हणाले, ''समाजातील प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे. आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबता कामा नये. विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके किंवा शैक्षणिक साहित्य देणे हा केवळ मदतीचा उपक्रम नसून त्यांच्या स्वप्नांना बळ देण्याचा प्रयत्न आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा जबाबदार नागरिक आणि देशाचा कर्तृत्ववान आधारस्तंभ असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये केलेली गुंतवणूक म्हणजे राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी आहे.''

ते पुढे म्हणाले, ''वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. सामाजिक कार्य, पर्यावरण संरक्षण आणि शिक्षण या तिन्ही क्षेत्रात युवकांनी पुढाकार घेतला तर समाज परिवर्तनाचा वेग निश्चितच वाढेल. भारतीय जनता युवा मोर्चा समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत राहील आणि युवकांना सकारात्मक कार्यासाठी प्रेरित करत राहील.''

यावेळी जिल्हाध्यक्ष रुद्रेश अंबाडे म्हणाले, ''बालघरातील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलविणे आणि त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासात छोटासा हातभार लावणे हेच या उपक्रमामागील मुख्य उद्दिष्ट आहे. समाजातील वंचित आणि गरजू घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. युवकांनी सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतल्यास समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते. त्यामुळे भाजयुमोच्या माध्यमातून अशा उपक्रमांची मालिका सातत्याने राबविली जाईल.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मनापासून शुभेच्छा देत अभ्यासात सातत्य, शिस्त आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन करण्याचे आवाहन केले.

# भाऊसाहेब फिरोदियाच्या गुंजनचा अखेर दहावीत 'परफेक्ट १०० टक्के'चा मान

## दहावीच्या २०२५-२६ बॅचमध्ये जिल्ह्यात १००% गुण मिळवणारी ठरली एकमेव विद्यार्थिनी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलची विद्यार्थिनी गुंजन महेश गोले हिने दहावीच्या परीक्षेत अखेर शंभर टक्के गुण प्राप्त करून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. प्रारंभी ९९.४० टक्के गुण मिळाल्यानंतर फोटो कॉपी तपासणी व पुनर्मूल्यांकनाच्या प्रक्रियेनंतर तिच्या गुणांमध्ये वाढ होत अखेर तिला १०० टक्के गुण मिळाल्याचे अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आले. या यशामुळे ती अहिल्यानगर जिल्ह्यात शंभर टक्के गुण मिळवणारी एकमेव विद्यार्थिनी ठरली आहे.

गुंजनच्या या अभूतपूर्व यशाबद्दल अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने तिचा विशेष सत्कार करण्यात आला. संस्थेच्या प्रमुख छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते तिचा गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेचे खजिनदार प्रकाश गांधी, मुख्याध्यापक कैलास साबळे, महेश वसंत गोले, अंजली गोले, प्रमोद गांधी आदी उपस्थित होते.

दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर गुंजनला ९९.४० टक्के गुण मिळाले होते. गुणवाढीची शक्यता लक्षात घेऊन उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती मागविण्यात आल्या. त्यानंतर झालेल्या तपासणीत तिचे गुण वाढून ९९.८० टक्यांवर पोहोचले. मात्र, यानंतरही तिच्या पालकांनी संबंधित विषयांच्या गुणांचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर पुनर्मूल्यांकन प्रक्रियेनंतर तिच्या गुणांमध्ये आणखी वाढ होऊन तिला १०० टक्के गुण मिळाल्याचे नुकतेच कळविण्यात आले.

पुणे विभागातून यंदा सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली होती. या सर्व विद्यार्थ्यांमधून केवळ बारा विद्यार्थ्यांना शंभर टक्के गुण मिळविण्याचा मान मिळाला आहे. त्यामध्ये गुंजन गोलेचा समावेश असून, तिच्या या यशामुळे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलसह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचा शैक्षणिक सन्मान उंचावला आहे.

गुंजनच्या यशामागे तिची जिद्द, कष्ट, कुटुंबाचे आणि शिक्षकांचे मोठे योगदान असल्याचे स्पष्ट करुन छायाताई फिरोदिया यांनी तिचे विशेष कौतुक केले. तिचे वडील महेश गोले हे व्हीआरडीईमध्ये अधिकारी म्हणून कार्यरत आहेत, तर आई अंजली गोले या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये शिक्षिका आहेत. घरातील शैक्षणिक वातावरण, नियमित अभ्यास, शिस्तबद्ध दिनचर्या आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या बळावर तिने हे यश संपादन केले.

# कथक ही केवळ कला नव्हे, तर संस्कार आणि व्यक्तिमत्त्व घडविणारी जीवनसाधना- प्रिया ओगले-जोशी

## अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या कथक परीक्षेत 'नृत्यझंकार'चा यशाचा झंकार; ३८ विद्यार्थिनींना विशेष योग्यता



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या कथक नृत्याच्या विविध स्तरावरील परीक्षांमध्ये नृत्यझंकार डान्स स्कूलच्या विद्यार्थिनींनी नेत्रदीपक यश संपादन करत अहिल्यानगर केंद्रात मानाचे स्थान पटकावले आहे. पहिली ते पाचवी या विविध स्तरांच्या परीक्षांमध्ये तब्बल ३८ विद्यार्थिनींनी विशेष योग्यता (डिस्टिंक्शन) प्राप्त केली असून सर्वच स्तरांवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे नऊ विद्यार्थिनींनी पैकीच्या पैकी गुण मिळवत उत्कृष्टतेचा नवा मानदंड निर्माण केला आहे.

प्रारंभिक (प्रथम वर्ष) परीक्षेत रेणुका दहातोंडे, वर्षा चांडाळे, शीतल शेळके, सृष्टी धामणे, स्माईली परदेशी, सिद्धी घोडेस्वार, गायत्री बेल्हेकर आणि अन्विता कुलकर्णी यांनी विशेष योग्यता मिळवली, तर दिविजा कापसे हिने प्रथम क्रमांक पटकावत केंद्रात मानाचे स्थान मिळवले.

प्रवेशिका पूर्ण (द्वितीय वर्ष) परीक्षेत नमिता फिरोदिया, युगंधरा घुले आणि धनश्री गाडे यांनी यश संपादन केले. यामध्ये धनश्री गाडे हिने द्वितीय क्रमांक मिळवला. गौरी तांबे, अन्वी हापस, खुशबू मेश्राम आणि जान्हवी अकुबतीन यांनीही उत्कृष्ट कामगिरी करत यशाची परंपरा कायम राखली. जान्हवी अकुबतीन हिने तृतीय क्रमांक पटकावला.

प्रवेशिका प्रथम परीक्षेत डॉ. भक्ती क्षीरसागर यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच सानवी दुगम, रिया गवळी, सानवी भोर आणि सार्थिका पानसरे यांनी तृतीय क्रमांक मिळवत संस्थेच्या यशात भर घातली. मध्यमा पूर्ण (पाचवे वर्ष) परीक्षेत सई गर्जे हिने प्रथम क्रमांक, समृद्धी खिस्ती हिने द्वितीय क्रमांक तर मनस्वी गंधे हिने तृतीय क्रमांक मिळवून नृत्यझंकारच्या यशाचा झेंडा उंचावला.

या सर्व यशस्वी विद्यार्थिनींना नृत्यझंकार डान्स स्कूलच्या संचालिका तथा कथक नृत्यगुरू प्रिया ओगले-जोशी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. लय, ताल, अभिनय, सातत्यपूर्ण रियाज आणि शास्त्रीय नृत्याची सखोल जाण यामुळे विद्यार्थिनींनी हे यश संपादन केले.

यावेळी प्रिया ओगले-जोशी म्हणाल्या, ''कथक ही केवळ नृत्यकला नसून ती भारतीय संस्कृती, परंपरा आणि मूल्यांचे जतन करणारी साधना आहे. विद्यार्थिनींनी वर्षभर अत्यंत मेहनतीने सराव केला. त्यांच्या जिद्दीमुळे आणि कलेप्रती असलेल्या समर्पणामुळे हे यश मिळाले आहे. प्रत्येक विद्यार्थिनीच्या यशामागे तिची मेहनत आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. या निकालामुळे नृत्यझंकार परिवाराचा गौरव वाढला आहे.

त्या पुढे म्हणाल्या, आजच्या स्पर्धात्मक युगात कला विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, संयम आणि सकारात्मक विचार देण्याचे काम करते. कथकच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच संस्कारांचे संवर्धन होते. भविष्यात अधिकाधिक विद्यार्थ्यांना शास्त्रीय नृत्याकडे आकर्षित करून त्यांना राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर घडविण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे.

### हिंद सेवा मंडळाचे माजी अध्यक्ष तथा भाजपचे

# ज्येष्ठ नेते सुनील रामदासी यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते सत्कार

## ज्येष्ठांचे अनुभव, कार्य आणि विचार समाजाला ऊर्जा व प्रेरणा देणारे – आमदार संग्राम जगताप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हिंद सेवा मंडळाचे माजी अध्यक्ष तथा भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते सुनील रामदासी यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते त्यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला.

या प्रसंगी माजी उपमहापौर दीपक सूळ, नगरसेवक महेश तवले, माजी नगरसेवक सुरेश तिवारी, संतोष सूर्यवंशी, आनंद पुंड, कैलास शिंदे, किरण पिसोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, ज्येष्ठांचे अनुभव, कार्याची शिदोरी आणि त्यांनी आयुष्यभर जोपासलेले मूल्याधिष्ठित विचार समाजाला ऊर्जा, प्रेरणा आणि योग्य दिशा देणारे असतात. प्रत्येक पिढीला ज्येष्ठांच्या अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली पाहिजे.

ते पुढे म्हणाले की, सुनील रामदासी यांनी आपल्या कार्यकाळात सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत समाजात आपला वेगळा ठसा उमटविला आहे. विविध क्षेत्रांतील त्यांच्या कार्यामुळे अनेकांना प्रेरणा मिळाली असून समाजहितासाठी त्यांनी सातत्याने काम केले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना आनंद होत असल्याचेही आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनीही सुनील रामदासी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या निरोगी, दीर्घायुष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात पार पडला.

# भारतीय जनता युवा मोर्चा, उत्तर अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्ष पदी कुणाल बोरुडे यांची निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नेवासा तालुक्यातील बेलपिंपळगाव येथील युवा कार्यकर्ते कुणाल बोरुडे यांची भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड आज जिल्हाध्यक्ष रोहित चौधरी यांनी जाहीर केली आहे. या अगोदर कुणाल बोरुडे यांनी भाजपच्या तालुका युवा मोर्चा सचिव, तालुका मीडिया संयोजक, जिल्हा सोशल मीडिया संयोजक या आणि अशा अनेक पदावर काम केलेले आहे.

या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार सुजय विखे पाटील, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, जिल्हा उपाध्यक्ष ऋषिकेश शेटे, अहिल्यानगर उत्तरभाजप आयटीसेल चे जिल्हाध्यक्ष आदिनाथ पटारे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. तसेच अहिल्यानगर जिल्हा उत्तर भारतीय जनता पार्टीच्या सर्व पदाधिकाऱ्यांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यात लवकरच युवा मोर्चा ची संघटना मजबूत करून युवकांची मोठी फळी भारतीय जनता पार्टीच्या समर्थनात उभी करून मिळालेल्या पदाला प्रामाणिक न्याय देण्याचा प्रयत्न करेल..... भाजप युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष कुणाल बोरुडे

(पान १ वरून)

# भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांची आमदार संग्राम जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

आवश्यक उपक्रम राबविणे तसेच विकासकामांना गती देण्याबाबत सकारात्मक विचारविनिमय झाला.चर्चेदरम्यान कृष्णराज महाडिक यांनी अहिल्यानगर शहरात आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत सुरू असलेल्या विकासकामांबद्दल समाधान व्यक्त केले. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेले उपक्रम आणि नागरिकाभिमुख कामांमुळे शहराच्या विकासाला नवी दिशा मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

# केडगाव प्रभाग क्रमांक १६ मधील भाग्योदय मंगल कार्यालय नागरिकांसाठी खुले करावे

झाले असून नागरिकांच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

सुरज कोतकर यांनी पुढे म्हटले आहे की, भाग्योदय मंगल कार्यालय सर्वसामान्य नागरिकांसाठी सुरू झाल्यास प्रभागातील गरीब, सर्वसामान्य व मध्यमवर्गीय कुटुंबांना अत्यल्प दरात विवाह सोहळे, सामाजिक कार्यक्रम, सांस्कृतिक उपक्रम तसेच विविध कौटुंबिक समारंभ आयोजित करण्यासाठी मोठा आधार मिळणार आहे. खासगी मंगल कार्यालयांचे वाढते भाडे लक्षात घेता महानगरपालिकेचे हे मंगल कार्यालय नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.प्रभागातील अनेक नागरिक या मंगल कार्यालयाच्या उद्घाटनाची व प्रत्यक्ष वापरासाठी सुरू होण्याची आतुरतेने वाट पाहत असून संबंधित विभागास आवश्यक सूचना करून हे मंगल कार्यालय नागरिकांच्या सेवेसाठी तातडीने खुले करण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

यावेळी माजी स्थायी समिती सभापती मनोज कोतकर हेही उपस्थित होते. त्यांनीही भाग्योदय मंगल कार्यालय लवकर सुरू करण्याची गरज व्यक्त करत नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्याचे आवाहन केले.यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की लवकरात लवकर मंगल कार्यालय सुरू करण्याबाबत महापालिका प्रशासनाला सूचना दिल्या जातील असे ते म्हणाले

# रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशात अव्वल;

विकासाभिमुख विचारांमुळे महाराष्ट्रातील ग्रामीण भागात परिवर्तनाची नवी दिशा निर्माण होत आहे. आज सादर केलेल्या कामांची माहिती ऐकून त्यांनी व्यक्त केलेले समाधान आणि दिलेली प्रेरणा ही आम्हा सर्वांसाठी अधिक जोमाने व ताकदीने कार्य करण्याची ऊर्जा देणारी आहे. भरतशेट गोगावले मंत्री, रोजगार हमी योजना व फलोत्पादन विभाग.

# बाधित शेतकऱ्यांसाठी २१.३० कोटींच्या मदतीला मंजुरी

मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. ही मदत शासनाच्या २७ मार्च २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आली असून, ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या पिकांसाठीच ती लागू राहणार आहे. त्यानुसार जिरायत क्षेत्रासाठी प्रतिहेक्टर ८ हजार ५०० रुपये, बागायत क्षेत्रासाठी प्रतिहेक्टर १७ हजार रुपये, तर फळबागांसाठी प्रतिहेक्टर २२ हजार ५०० रुपये या दराने आर्थिक मदत दिली जाणार आहे. मदतीचे वितरण करताना यापूर्वी चालू हंगामात वितरित करण्यात आलेल्या निधीमध्ये या मंजूर अनुदानाचा समावेश होणार नाही, याची खात्री करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. तसेच एका हंगामात विहित दराने केवळ एकदाच मदत दिली जाईल, याची संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.अनुदानाची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार असून, कोणत्याही शेतकऱ्यास दुबार मदत मिळणार नाही यासाठी तहसील कार्यालयांनी काटेकोर पडताळणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मंजूर निधीचा वापर केवळ निर्धारित उद्देशासाठीच करावा तसेच शासन निर्णयातील सर्व निकष, अटी व शर्तींचे पालन करूनच मदतीचे वितरण करावे, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीनंतर आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना या निर्णयामुळे काहीसा दिलासा मिळणार असून, अनुदानाची रक्कम लवकरात लवकर वितरित होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.